आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२५

ठळक बातम्या

1. वस्त्रोद्योग क्षेत्राच्या गरजा ओळखून बँकिंग क्षेत्राने त्यांना योग्य ते सहकार्य करावे असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे 'भारत टेक्स २०२५' मध्ये आवाहन.

2. लव जिहाद प्रकरणात योग्य कार्यवाही करणार असल्याच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच नागपुरात प्रतिपादन.

3. नागपूरच्या काटोल येथे एका फटाक्याच्या कारखान्यातील स्फोटात 2 जणांचा मृत्यू 3 जण जखमी.

4. नवी दिल्ली स्थानकावरच्या दुर्घटनेच्या चौकशीसाठी रेल्वेची समिती स्थापन / दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन रेल्वेमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी काँग्रेसची मागणी.

भारत टेक्स २०२५

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं भारत टेक्स २०२५ मध्ये वस्त्रोद्योग क्षेत्राच्या गरजा ओळखून बँकिंग क्षेत्राने त्यांना योग्य ते सहकार्य करावे असे आवाहन केले. या वस्त्रोद्योग प्रदर्शनामध्ये 120 देशातील वस्त्रोद्योग उत्पादनांना एक मंच मिळत असून या प्रदर्शनामध्ये भारताच्या सांस्कृतिक विविधतेचे दर्शन होत असल्याचे पंतप्रधानांनी सांगितलं. दरम्यान, आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शनाचे मोदी यांनी अवलोकन करून तेथील कारागिरांशी संवाद देखील साधला. हे प्रदर्शन उद्यापर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्चा मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. प्रदर्शनाबरोबरच विविध चर्चासत्र आणि प्रशिक्षण कार्यक्रमही घेतले जात आहेत. नवोन्मेष उपक्रम आणि स्टार्ट अप दालन तसंच हॅकेथॉनवर आधारित स्टार्टअप पिच फेस्ट आणि निधी योजना असे कार्यक्रम, तसंच डिझाइन स्पर्धाही घेण्यात येत आहेत. ITMF म्हणजे आंतरराष्ट्रीय वस्त्रोद्योग उत्पादक महासंघ, ICAC म्हणजे आंतरराष्ट्रीय कापूस सल्लागार समिती – यासह – जगभरातल्या २५ हून अधिक आघाडीच्या जागतिक वस्त्रोद्योग संस्था आणि संघटना या प्रदर्शनामध्ये सहभागी झाल्या आहेत.

लव्ह जिहाद

बेकायदा धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्याच्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारनं पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीत महिला आणि बालकल्याण विभाग,

अल्पसंख्याक व्यवहार विभाग, विधी आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग या विभागांचे सचिव तसंच गृह विभागाच्या उपसचिवांचा समावेश आहे. ही समिती बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा अभ्यास करेल, आणि यासंदर्भातल्या तक्रारींवरील कार्यवाहीसाठीच्या उपाययोजना सुचवणार आहे. इतर राज्यांमधल्या यासंदर्भातल्या कायद्यांचा ही समिती अभ्यास करणार आहे. दरम्यान लव जिहादच्या प्रकारणांवर सरकार योग्य ती कारवाई करेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरात प्रसारमाध्यमांना सांगितल.

*दुसऱ्या धर्मातल्या व्यक्तीशी लग्न करणे हे गैर नाही पण खोटं बोलून, खोटी आयडेंटिटी तयार करून, त्या ठिकाणी फसवणूक करून अशा प्रकारचं लग्न करायचं आणि मुलं जन्माला घालून सोडून द्यायचं, हि जी प्रवृत्ती चाललेली आहे. या ज्या फूस लावणे, फसवणूक करणे, जाणीवपूर्वक खोटारडेपणा करणे अस जे चाललेलं आहे, हे मात्र योग्य नाही आणि म्हणून या संदर्भात जी काही योग्य कारवाई आहे ती राज्य सरकार करेल.*

महाकुंभ प्रयाग योग

प्रयागराज येथे सनातन संस्कृतीचे भव्य दर्शन घडविणारा कुंभमेळा सुरू आहे. आस्थेचा असा भव्य संगम जगात कुठेही पाहायला मिळणार नाही. मानवी संस्कृती आणि सभ्यतेमध्ये हजारो वर्षापासून हा संगम आपल्याला कुंभमेळयाच्या निमित्ताने पाहायला मिळतो. भाविक जात, भाषा, पंथ विसरून कुंभमेळयात एकत्रित येतात. हा समाजाच्या एकतेचा योग असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.नागपूरच्या रेशीमबाग मैदानात आयोजित 'महाकुंभ प्रयाग योग' कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते.

*व्हाल्यूएबल ग्रुप आणि सत्संग फाउंडेशननीं एक खूप सुंदर उपक्रम याठिकाणी घेतला. संगमावर जाऊन संगमाचं पाणी त्या ठिकाणी घेऊन आले आणि लोकांना ज्यांना महाकुंभाला जाता येत नाही त्यांच्या करता याठिकाणी त्यांनी सोय केली. सोबत महाराष्ट्रातले जे प्रमुख संत आहेत त्या संतांच्या पादुका देखील या ठिकाणी आणले आहेत. एक प्रकारे ज्या लोकांच्या मनात शल्य होतं की इतका मोठा कुंभपर्व चाललेला आहे पण काही कारणाने आम्ही पोहचू शकत नाही त्यांच्या करता ही व्यवस्था अतिशय चांगल्या प्रकारे त्यांनी केली आहे.*

५० कोटींपेक्षा जास्त भाविकांनी आतापर्यंत कुंभमेळयात स्नान केले असल्याचे मुख्यमंत्री  फडणवीस यावेळी म्हणाले.द सत्संग फाउंडेशन नागपूर केंद्राचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे, राजेश लोया, अमेय मेटे यावेळी उपस्थित होते.

स्फोट

नागपूर जिल्ह्यातील काटोल येथे एका फटाक्याच्या कारखान्यात ल्या स्फोटात दोन जणांचा मृत्यू झाला आणि 3 जण जखमी झाले. जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ५० किलोमीटर अंतरावर असलेल्या काटोल तहसीलमधील कोतवालबर्डी येथील एशियन फायरवर्क्समध्ये दुपारी दीड वाजता हा स्फोट झाला, असे नागपूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक डॉ.हर्ष पोद्दार यांनी सांगितल.

*एशियन फायरवर्क्स बोल कर के ये फॅक्टरी है, जो की कल्मेश्वर पुलिस स्टेशन में स्थित है। यहाँ पर फायरवर्क्स प्रोड्यूस होता है। यहाँ पर तकरीबन डेढ़ बजे एक ब्लास्ट हुआ, मेलबॉल यूनिट बोल कर के जिसमें दो लोगों की मृत्यु हुई। इसको छोड़ कर के तीन लोगों को सिंपल इंजरीज हुए हैं।*

स्फोटाच नेमक कारण फॉरेन्सिक तपास झाल्यानंतरच कळेल असे देखील पोद्दार यांनी स्पष्ट केलं.

सन्मित्र महिला नागरी सहकारी बँक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. जेथे आर्थिक संस्था उभ्या राहतात, तेथे विकास भरभरून होतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील प्रत्येक नागरिकाला बँकिंग क्षेत्रासोबत जोडले आहे. आज भारतातील प्रत्येक नागरिकाचे बँक खाते आहे. त्यामुळे एक डीजीटल ओळख निर्माण झाली आहे. त्याचा फायदा थेट नागरिकांना मिळत असून देशाच्या व सर्वसामान्य नागरिकांच्या विकासामध्ये आर्थिक संस्थांचा मोलाचा वाटा असतो, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर येथे व्यक्त केले. सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेच्या रौप्य महोत्सवी सोहळयानिमित्त प्रियदर्शनी इंदिरा सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री  फडणवीस बोलत होते. यावेळी मंचावर राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके उपस्थित होते. सन्मित्र महिला नागरी सहकारी बँकेने 25 वर्ष यशस्वीपणे पूर्ण केले, असे सांगून  आज 300  कोटींची उलाढाल असलेल्या सन्मित्र बँकेचा एनपीए 0.5 टक्क्यांच्या

खाली आहे, ही अतिशय उत्कृष्ट कामगिरी असून यासाठी सर्व संचालक मंडळ आणि कर्मचारी अभिनंदनास पात्र आहेत असे मुख्यमंत्री म्हणाले.

आयुष रूग्णालय

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आयुष कार्यक्रमातंर्गत वर्धा येथे 30 खाटांचे आयुष रूग्णालय मंजूर करण्यात आले आहे. या रूग्णालयाच्या बांधकामासाठी 13.78 कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात यावा, अशी मागणी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केंद्रिय आयुष राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार प्रतापराव जाधव यांच्याकडे केली होती. त्यांच्या प्रयत्नामुळे रूग्णालयाच्या बांधकामासाठी 10 कोटी 50 लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. या रुग्णालयासाठी जिल्हा परिषदेने शहरालगतच्या म्हसाळा ग्राम पंचायत क्षेत्रातील सर्वे क्रमांक 29 मधील जागा उपलब्ध करून दिली आहे.

नवी दिल्ली स्थानक चेंगराचेंगरी

नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री चेंगराचेंगरी होऊन किमान १८ जणांचा मृत्यू झाला. प्रयागराजला जाणाऱ्या गाड्यांमध्ये चढण्यासाठी अचानक अलोट गर्दी झाल्यामुळे ही दुर्घटना घडली. मृतांमधे महिलांचा, आणि दहा वर्षांखालील दोन बालकांचा समावेश आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत जाहीर झाली आहे. नवी दिल्ली स्थानकावर परिस्थिती आता नियंत्रणात असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्ली स्थानकावरची गर्दी कमी करण्यासाठी दिल्लीहून प्रयागराजला जाण्यासाठी तात्काळ चार गाड्या सोडण्यात आल्याचंही त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशातून सांगितलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, यांनी घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या प्रियजनांचं त्यांनी सांत्वन केलं असून जखमी झालेल्यांना लवकर बरं वाटावं अशी कामना केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दुर्घटनेबद्दल तीव्र शोकभावना प्रकट केली आहे. फलाट क्रमांक १४ आणि १५ वर उतरण्यासाठी असलेल्या पुलावरुन उतरताना काहीजण घसरले त्यामुळे गर्दीतली माणसं एकमेकांवर कोसळल्यामुळे चेंगराचेंगरी झाल्याचं उत्तर रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितलं. दरम्यान, नवी दिल्ली रेल्वे स्थानकावरच्या दुर्घटनेची जबाबदारी स्वीकारुन रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. काँग्रेसच्या पक्ष प्रवक्ता सुप्रिया श्रीनेत यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. दुर्घटनेच्या वेळी बचावकार्याऐवजी सरकार आकडे लपवण्यात गुंतलं होतं असा आरोप त्यांनी केला.